# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### नागपूर जिल्ह्यातील घरकुल बांधकामाचा प्रलंबित निधी लाभ धारकांना देण्याबाबत

**(१) १२९९५ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील घरकुल बांधकामाचा कोट्यवधी रुपयाचा प्रलंबित निधी लाभ धारकांना देण्यात यावा या मागणीसाठी कामठी तहसिल कार्यालयावर विविध गावातील ग्रामस्थांनी मोर्चा काढून निवेदन दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१९-०६-२०२३) :** (१) होय.

(२) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत एकूण २३ प्रकल्पांना केंदीय मान्यता व संनियंत्रण समितीची मंजुरी प्राप्त असून, सदर प्रकल्पांना दिनांक २५/०२/२०२२ पर्यंत राज्य शासनाच्या हिश्यापोटीचा रुपये २०१.०४६ कोटी व केंद्र शासनाचा पहिल्या टप्प्यापोटीचा रुपये १२२.५९२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व अंमलबजावणी यंत्रणांना PFMS system वर mapped करताना Zero Balance Account उघडणे आवश्यक असल्याने, अंमलबजावणी यंत्रणांकडे अखर्चित असलेला निधी SNA Account मध्ये जमा करण्यात आला होता.

NMRDA ला सन २०२२-२३ मध्ये रुपये २५५.१० कोटी इतके Credit Limit देण्यात आले असून सद्य:स्थितीत रुपये ११२.२० कोटी इतका खर्च झाला आहे. व रुपये १४२.९०८ कोटी Credit Limit NMRDA कडे शिल्लक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील लहरी हवामानामुळे द्राक्ष व संत्रा फळ उत्पादकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(२) १५४७९ (२८-१२-२०२२) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लहरी हवामानामुळे द्राक्ष हंगाम दोन महिन्यांनी लांबणीवर पडणार असल्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कडाक्याच्या उन्हामुळे मृग आणि अतिपावसामुळे अंबिया असे संत्र्याचे दोन्ही बहर झडल्याने यावर्षी संत्री उत्पादनात ६० टक्क्याहून अधिक घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, द्राक्ष आणि संत्रा उत्पादकांना अनुदान देणे तसेच सदर फळपिकांची निर्यात वाढविण्याकरीता शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. माहे जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत अतिपावसामुळे ३३ % पेक्षा जास्त नुकसान झालेल्या संत्रा/मोसंबी पिकाच्या बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्यात आला आहे.

(३) पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना अंतर्गत मृग बहार २०२२ मध्ये द्राक्ष या फळपिकासाठी योजनेच्या अटी व शर्तीनुसार शेतकऱ्यांना रक्कम रुपये २३६.०० लाख इतकी विमा नुकसान भरपाई देय झाली आहे. तसेच आंबिया बहार २०२२-२३ मध्ये द्राक्ष या पिकाचा विमा सरंक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर विमा नुकसान भरपाई अदायगीची कार्यवाही संबंधित विमा कंपनीमार्फत करण्यात येईल.

मृग बहार २०२२ मध्ये संत्रा या फळपिकासाठी योजनेच्या अटी व शर्तीनुसार शेतकऱ्यांना रक्कम रुपये ८०३.५३ लाख इतकी विमा नुकसान भरपाई देय झाली आहे. तसेच आंबिया बहार २०२२-२३ मध्ये द्राक्ष या पिकाचा विमा सरंक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर विमा नुकसान भरपाई अदायगीची कार्यवाही संबंधित विमा कंपनीमार्फत करण्यात येईल.

राज्यात माहे जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधी अतिपावसामुळे ३३ % पेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतीपिके/फळ पिकांखालील एकूण ६६.३१ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. बाधित झालेल्या क्षेत्राकरीता रक्कम रूपये ६,९९४.६२८ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

फळपिकांची निर्यात वाढविण्याकरीता सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून दिनांक १५/०२/२०२०, दिनांक ०६/०९/२०२१ व दिनांक २२/१२/२०२१ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून सदर शासन निर्णयान्वये नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) १. राज्याच्या कृषी निर्यात धोरणांतर्गत विविध कृषी मालाची निर्यात वृद्धी होण्याकरीता जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष क्लस्टर फॅसिलिटेशन सेल यांच्या अध्यक्षतेखाली बैठका, त्याचबरोबर क्लस्टर अंतर्गत वेबिनारद्वारे प्रशिक्षण, बायर- सेलर मिटचे आयोजन, पणन मंडळ तसेच अपेडाच्या माध्यमातून क्लस्टर निहाय कार्यशाळा, अपेडा व संबंधित देशांचे राजदुतावास यांचेमार्फत आंतरराष्ट्रीय (व्हर्चुअल) बायर-सेलर

मिट, आयोजन करणे असे अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.
२. निर्यातक्षम फळबागांच्या नोंदणीकरीता सन २००३-०४ पासून द्राक्ष बागांसाठी “हॉर्टीनेट ट्रेसिबीलिटी” ही ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली असून त्यामध्ये द्राक्षासह आता संत्रा, आंबा, डाळिंब, भाजीपाला, खाण्याचे पान या फलोत्पादन पिकांचा समावेश करण्यात आला आहे.
३. ट्रेसेबिलीटी सिस्टम अंतर्गत निर्यातक्षम फळबागांची/शेतांची नोंदणी, तपासणी करुन पीक उत्पादन पध्दती, लेबल क्लेम कीडनाशकांचा वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, कीडनाशक उर्वरित अंश पातळी, इ.बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते.
४. निर्यातक्षम फळबागांची/शेतांची नोंदणीसाठी मार्गदर्शन याकरीता कृषी विभागाकडून जिल्हास्तरावर कृषी निर्यात कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्याचबरोबर, १२ जिल्ह्यांमधील १६ अधिकाऱ्यांमार्फत निर्यात होणाऱ्या कृषी मालाला फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## कल्याण-बदलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गांसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरु असल्याबाबत

**(३) १६४०४ (२८-१२-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-बदलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गांसाठी शेतकऱ्यांची जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामासाठी कल्याण-उल्हासनगर-अंबरनाथ तालुक्यातील १३.४० हेक्टर जागेची गरज भासणार असून या जागेपैकी १०.६० हेक्टर जागा खासगी व २.८० हेक्टर जागा शासकीय आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाअंतर्गत चिखलोली येथे रेल्वे स्थानक उभारले असून सदर जागा भूसंपादन करुन दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी शेतकऱ्यांच्या ७/१२ वर भूसंपादन समावेश असा शेरा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांची रेल्वे मार्गांसाठी भूसंपादानाची प्रक्रीया सुरु असूनही शेतकऱ्यांना मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी) प्रकल्पांतर्गत शासकीय नियमाप्रमाणे अद्याप मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे मोबदला मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) : (**१) होय हे खरे आहे.
(२) कल्याण-बदलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी संपादन संस्थेकडून प्राप्त प्रस्तावानुसार खालील जमिनींची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | तालुका | आवश्यक असलेली शासकीय जमीन (हे.आर) आवश्यक | आवश्यक असलेली खाजगी जमीन (हे.आर) आवश्यक | एकूण (हे.आर) |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर | १/४१/८० | ०/१९/९० | १/६१/७० |
| २ | अंबरनाथ | ४/६२/९६ | ६/५८/६२ | ११/२१/५८ |
| ३ | कल्याण | -- | ०/०६/०४ | ०/०६/०४ |
| एकूण | | ६/०४/७६ | ६/८४/५६ | १२/८९/३२ |

(३) कल्याण-बदलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्ग प्रकल्पांतर्गत उल्हासनगर उपविभागातील मौजे चिखलोली, व इ. गावातील संपादित जमिनीच्या गा.न.नं.७/१२ सदरी इतर हक्कामध्ये उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयाकडील दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये भूसंपादनात समाविष्ट असा शेरा ठेवण्यात आलेला आहे.

(४) व (५) अंबरनाथ तालुक्यातील को. खुटंवली, कात्रप, कुळगांव, बेलवली, मोरीवली व चिखलोली या गावातील संपादित क्षेत्राच्या निवाड्याची रक्कम उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे पत्र दिनांक २८/०१/२०२२ अन्वये संपादन संस्थेकडे मागणी केलेली आहे.

तसेच कल्याण ते बदलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गासाठी मुंबई विकास रेल्वे कॉर्पोरेशन लि. या संपादन संस्थेकडून प्राप्त प्रस्तावानुसार मौजे काटेमानिवली, ता.कल्याण येथील क्षेत्र ०/०५/८० हे. आर व मौजे खडेगोळवली येथील क्षेत्र ०/००/२४ हे. आर संपादित होत आहे. त्याअनुषंगाने बाधित होणारे खाजगी क्षेत्राचा भूसंपादनाचा निवाडा दिनांक २२/०३/२०२२ रोजी घोषित करण्यात आलेला आहे. सदर निवाडा रक्कमेची मागणी उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनी पत्र दिनांक २२/०६/२०२२ अन्वये संपादन संस्थेस केलेली आहे त्यानंतर पुन्हा दिनांक ७/११/२०२२ व दिनांक ०७/०२/२०२३ रोजीच्या स्मरणपत्रान्वये उक्त मोबदल्याची मागणी करण्यात आलेली आहे. आजमितीस संपादन संस्थेमार्फत मोबदला रक्कम प्राप्त झालेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऊसतोडीच्या मुकादमाकडून आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(४) १७३७८ (२५-०३-२०२३) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) “अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, शेंद्रे (ता.जि.सातारा) व किसन वीर सहकारी साखर कारखाना, भुईंज (ता.वाई,जि.सातारा) या कारखान्यांसाठी सन २०२२-२३ या कालावधीतील गळीप हंगामासाठी ऊसतोडीकरीता मजुर पुरविणेबाबतचा करार कर्नाटक राज्यातील मुकादम, रा.ढोकळेवाडी जलगेरी (ता.जि.विजापूर) यांच्याबरोबर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारानुसार उससतोडीकरीता २४ मजुर पुरविण्याचे कबुल करुन त्यासाठी रुपये २४ लाख ८० हजार इतकी रक्कम श्री.राजाराम भानुदास शेडगे व गणपत संपत शेडगे रा.अंगापूर, ता.कोरेगाव, जि.सातारा यांनी मुकादमास दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामाकरीता मजुर पुरविण्याचे पैसे घेऊनही मजुर न पुरविल्यामुळे त्याबाबत घेतलेले पैसे परत करण्यास मुकादम नकार देत असल्याने या संदर्भात श्री.राजाराम शेडगे व श्री.गणपत शेडगे यांनी

सातारा पोलीस ठाणे येथे दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी व त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या मुकादमावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२२-०५-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी वाहन मालक श्री.राजाराम भानुदास शेडगे व श्री.गणपत संपत शेडगे यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. सबब वेगळी चौकशी करणेचा अथवा मुकादमावर कारवाई करणेचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गासाठी सांगली जिल्ह्यात केलेल्या भूसंपादनाबाबत

**(५) १७६९२ (२५-०३-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या बागायती जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर-रत्नागिरी महामार्ग सांगली जिल्ह्यातील २६ गावांमधून गेलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गासाठी १६ हजार शेतकऱ्यांची ३०५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महामार्गात गेलेल्या ३०५ हेक्टर जमिनीपैकी ३ हजार शेतकऱ्यांच्या जमिनीचा वाद निर्माण झाला असून उक्त वाद सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या लवादाकडे ५०० शेतकऱ्यांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सांगली जिल्ह्यातील गावांमधील जमिनी भूसंपादनात गेलेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०६-२०२३) :**(१), (२) व (३) राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ नागपूर - रत्नागिरी, मिरज उपविभागातील कवठे महाकाळ तालुक्यातील १६ गावे व मिरज तालुक्यातील १० गावे अशा एकूण २६ गावामधून गेला आहे. तसेच या २६ गावांमधील सुमारे ३०५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे.
(४) जमीनीच्या वादाबाबत तक्रारी अर्ज प्राप्त नाहीत. तथापि, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या ३ G (५) अंतर्गत तरतुदीनुसार केंद्रशासनाकडील भारत राजपत्र अधिसूचनेमधील असाधारण भाग - २ खंड iii उपखंड ii का.आ.२४७६ (अ) दिनांक २२/०६/२०२१ अन्वये नियुक्त लवाद तथा जिल्हाधिकारी,

सांगली यांच्याकडे वाढीव भूसंपादन मोबदला मागणीबाबत दिनांक २८/०३/२०२३ अखेर एकूण ६७२ अर्ज दाखल झाले आहेत. त्यापैकी ३६६ इतके अर्ज, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व लवाद व समेट अधिनियम, १९९६ यातील तरतूदीस अनुसरुन दिनांक २८/०३/२०२३ अखेर अर्धन्यायिक सुनावणीच्या रितसर प्रक्रियेअंती वेळोवेळी निर्गत करण्यात आले आहेत. उर्वरित अर्जावर रितसर सुनावणीअंती निर्णय घेण्यात येत आहे.
(५) अर्धन्यायिक कामकाजानुसार विहीत प्रक्रियेस अनुसरुन लवादाकडे प्राप्त अर्जांची निर्गती करण्याचे कामकाज सुरु आहे.
६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या पर्यटन क्षेत्राच्या विकासातून रोजगार निर्मिती आणि अर्थचक्राला गती देण्याबाबत

**(६) १७७५० (२४-०२-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राला नैसर्गिक, ऐतिहासिक, पौराणिक, भौगोलिक असे विविधांगी पर्यटनवैभव लाभले असून राज्यात जंगले, पुरातन गडकिल्ले, गुंफा, मंदिरे, समुद्रकिनारे, वन्यजीव असे पर्यटन वैविध्य जागतिक स्तरावर नेण्यासाठी पर्यटन विभागाने रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळण्याच्या दृष्टीने शासनाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पर्यटनक्षेत्राला चालना मिळावी या हेतून राज्यातील आदरातिथ्य क्षेत्रातील घटकांबरोबर २ हजार ९०५ कोटी रुपयांचा सामंजस्य करार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील पर्यटन वैभव जगभरासमोर खुले करण्यासाठी तसेच यातून देशातील व जगभरातील पर्यटक महाराष्ट्राकडे आकर्षित होतील आणि त्याद्वारे राज्याचा पर्यटन विकास होऊन रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेला गती मिळेल, यासाठी शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने राज्यातील पर्यटन स्थळांची माहिती घेऊन तेथे पर्यटकांना आवश्यक सेवा व दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन (०९-०३-२०२३) :** (१) होय.
(२) होय. (३) होय. (४) पर्यटनस्थळांच्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत राज्यातील विविध पर्यटनस्थळांच्या ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०२१-२२ मध्ये रुपये ६५२.५१ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

पर्यटन विकासाच्या दृष्टीने पर्यटन धोरण -२०१६ अंतर्गत कृषी पर्यटन धोरण, बीच शॅक्स धोरण, कॅराव्हॅन पर्यटन धोरण साहसी पर्यटन उपक्रम धोरण इत्यादी धोरणे घोषित करण्यात आली आहेत.

तसेच ‘प्रसिध्दी’ या योजनेंतर्गत राज्यातील पर्यटनस्थळांची प्रसिध्दी केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून योग्यता (फिटनेस) प्रमाणपत्र न घेता मुंबईतील रस्त्यावर नियमबाह्य पध्दतीने वाहतूक करणाऱ्या वाहनांविरोधात कारवाई करण्याबाबत

**(७) १७९२५ (०६-०२-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १३९२२ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून योग्यता (फिटनेस) प्रमाणपत्र न घेताच ३० हजारांहून अधिक वाहनांची मुंबईतील रस्त्यांवरुन वाहतूक सुरु असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गत वर्षीही सुमारे ५० हजारांहून अधिक वाहनांनी परिवहन विभागाकडून योग्यता (फिटनेस) प्रमाणपत्र घेतले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून योग्यता (फिटनेस) प्रमाणपत्र न घेता मुंबईतील रस्त्यावर नियमबाह्य पध्दतीने वाहतूक करणाऱ्या वाहनांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :**

दिनांक १४/०१/२०२३ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) व (३) मोटार वाहन विभागाच्या वाहन प्रणाली अभिलेखानुसार मुंबई विभागातील परिवहन संवर्गात वाहनांची संख्या ३,०३,११८ असून त्यापैकी ६३,०५८ वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र वैध नसल्याचे दिसून आले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता वापरल्या जाणाऱ्या वाहनांची वेळोवेळी तपासणी करुन मोटार वाहन अधिनियम व त्या अंतर्गत नियमातील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येते.

वायुवेग पथकामार्फत योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता वापरल्या जाणाऱ्या करणाऱ्या वाहनांवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली.

कालावधी :एप्रिल २०२२ ते जानेवारी २०२३

| **कार्यालयाचे नाव** | **दोषी वाहने** | **दंड वसुली** |
|---|---|---|
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य)** | ८९२ | ३७,४०,०००/- |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम)** | १०८९ | ३५,५५,०००/- |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व)** | २२८६ | ४२,५८,५००/- |
| **उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली** | ७८० | २,७३,०००/- |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील अनुसूचित जाती, नवबौध्द वस्त्यांच्या सर्वांगीण सुधारणा योजनेंतर्गत कामे पूर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) १७९४६ (१७-०२-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात अनुसूचित जाती, नवबौध्द वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, मलनि:स्सारण, वीज, समाज मंदिर इ. व्यवस्था करुन संबंधित वस्तीची सर्वांगीण सुधारणा करण्याच्या योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षाच्या कालावधीत मंजूर करण्यात आलेल्या १४७ कामांपैकी ५९ कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील अनुसूचित जाती, नवबौध्द वस्त्यांच्या सर्वांगीण सुधारणा योजनेंतर्गत अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत पालघर जिल्ह्यातील १४७ मंजूर कामांपैकी ९३ कामे पूर्ण झालेली आहेत व ६ कामे रद्द करण्यात आलेली आहेत. ५९ कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत नसून ४८ कामे प्रगतीत असून त्याकामांसाठी निधी उपलब्ध आहे,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील कृषी विभागात विविध प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) १७९९० (२९-०३-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील कृषी विभागात विविध प्रवर्गातील २०० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील कृषी विभागात एकूण किती व कोणत्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

अकोला जिल्ह्यात कृषी विभागाची एकूण ५६० पदे मंजूर असून यापैकी ३४० पदे भरलेली व २२० पदे रिक्त आहेत.

(२) कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याकरीता (सरळसेवा व पदोन्नती कोटा) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्तरावर तसेच विभागीय कृषी सहसंचालक स्तरावर कार्यवाही कार्यान्वित आहे. तद्रुषंगाने महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब(कनिष्ठ) संवर्गामध्ये दिनांक १८/११/२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने ८ अधिकाऱ्यांना अकोला जिल्ह्यात पदस्थापना दिलेली आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा [गट-अ, गट-ब आणि गट-ब(कनिष्ठ)] संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषी सेवा परीक्षा-२०२१ करीता एकूण २०३ आणि कृषी सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र कृषी प्रशासकीय सेवा संवर्गाचे सन २०२१ करीता एकूण २४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर अकोला जिल्ह्यातील रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यासाठी विचार करण्यात येईल.

मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यातील कृषी पर्यवेक्षकांची पदे कृषी सहाय्यकांमधून भरण्याकरीता दिनांक ०२/०४/२०२३ रोजी परीक्षा पार पडलेली असून सदर परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना कृषी पर्यवेक्षक पदावर पदस्थापना देण्याची कार्यवाही संबंधित विभागीय कृषी सहसंचालक स्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार अमरावती विभागातील गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता एकूण २९ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २०/०१/२०२३ रोजी विज्ञापीत करण्यात आली आहे. तसेच अमरावती विभागातील सहाय्यक अधीक्षक एकूण १० पदे व वरिष्ठ लिपिक एकूण ९ पदांची जाहिरात दिनांक ०५/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. कृषी विभागाचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नसल्यामुळे वित्त विभाग, शा.नि., दिनांक ३१/१०/२०२२ मधील तरतूदीनुसार कृषी विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. वरीलप्रमाणे अकोला जिल्ह्यातील पदे प्राथम्याने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी सूत गिरण्यांना दिलेल्या कर्जाची वसूली करण्याबाबत

**(१०) १८०३३ (०२-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाने १३ सहकारी सूत गिरण्यांना माहे जुलै, १९९८ ते मार्च, २०२१ या कालावधीत रुपये २७५ कोटी ७८ लाखांचे दीर्घ मुदतीचे कर्ज दिले असून सदरहू सर्व सूत गिरण्यांकडून रुपये १९५ कोटी ८८ लाख कर्जाची वसुली करण्याऐवजी फक्त एकाच सूत गिरणीकडून रुपये १ कोटी १० लाखांची वसुली झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी सूत गिरण्यांकडून कर्जाची परतफेड वेळेवर होत नसल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहकारी संस्था व महामंडळांच्या रुपाने सहकारी सूत गिरण्यांना दिलेल्या कर्जाची परतफेड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,
(२) हे खरे आहे,
(३) सहकारी सूत गिरण्यांना शासनाने दिलेल्या कर्जाची परतफेड करण्याबाबत संबंधित सूत गिरण्यांना वेळोवेळी म्हणजेच दिनांक ०५ जानेवारी व २८ सप्टेंबर, २०१८; २२ जुलै, २०१९; २४ जानेवारी, २०२० व १५ नोव्हेंबर, २०२१च्या प्रत्रान्वये नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्हातील ग्रामीण व आदिवासी भागात औषध खरेदी प्रक्रिया होवू न शकल्यामुळे औषधाचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(११) १८२२६ (२४-०२-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागात औषध तुटवडा असून, शासन स्तरावरून औषध खरेदीची १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी तांत्रिक मान्यता मिळून देखील अद्यापपर्यंत औषध खरेदी होवू शकली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे सन २०२१-२२ वर्षाचा औषध खरेदीसाठीचा तीन कोटी, ४१ लाख २० हजार रुपयांचा निधी पडून असून याची तांत्रिक मान्यता देखील शासन स्तरावरून १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी जिल्हा परिषदेला प्राप्त झाली तसेच सन २०२२-२३ मध्ये बिगर आदिवासी क्षेत्रासाठी देखील सुमारे दोन कोटींच्या निधीला तांत्रिक मान्यता मिळूनही जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून याबाबत निविदा प्रक्रियाच झाली नसल्याने औषध खरेदीला विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार येथील ग्रामीण व आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्ण कल्याण समितीच्या निधीतून अत्यावश्यक औषध खरेदी करून ग्रामीण भागात आरोग्य व्यवस्था सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागात औषध खरेदीची प्रक्रिया तात्काळ सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०३-२०२३) :** १) व २) आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई यांच्या दिनांक १७/११/२०२२ रोजीच्या तांत्रीक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहुन जिल्हा नियोजन समिती,नंदुरबार यांच्याकडील प्राप्त निधीतुन १० टक्के औषध खरेदी जिल्हास्तरावरुन करण्यात आलेली आहे.तसेच शासनाच्या दिनांक २९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित ९० टक्के रक्कमेच्या औषधी खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून पुरवठादारांस पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.
३) राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मार्गदर्शक सुचना PIP २०२२-२३ नुसार रुग्ण कल्याण समिती निधीच्या माध्यमातून खर्चाच्या बाबीमध्ये गरीब रुग्णांसाठी किरकोळ औषधी खरेदी करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर रुग्ण कल्याण समिती अंतर्गत प्राप्त निधीतून अत्यावश्यक प्रसंगी औषधे खरेदी करुन रुग्णास उपलब्ध करुन दिली जातात.
४) व ५) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यातील कृषी विभागात कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय बदलीसंदर्भात

**(१२) १८२२८ (२९-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विभागात आंतरविभागीय बदली करण्याबाबत दिरंगाई करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंतरविभागीय बदली करण्यात येत नसल्याने बदली करण्याबाबत कृषी विभागातील कर्मचाऱ्यांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी विभागात आंतरविभागीय बदली विहित कालावधीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

शासकीय कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार संवर्गांतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५/०५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आले आहे. या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कायमस्वरुपी समावेशनाबाबत मानवतावादी दृष्टीकोनातून केवळ अपवादात्मक परिस्थितीत कर्मचाऱ्याचे हित विचारात घेताना, शासकीय कामकाजाच्या निकडीचाही समतोलपणे विचार करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. कायमस्वरुपी समावेशन हा संबंधित कर्मचाऱ्याचा हक्क नसून प्रशासनाचे हित, सार्वजनिक सेवेचे हित विचारात घेऊन संबंधित कर्मचाऱ्याच्या विनंतीवरुन त्याचे अन्य कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करण्यास परवानगी /मंजूरी द्यावी किंवा कसे याचा आणि कायमस्वरुपी समावेशनाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यास त्यांच्या कार्यालयात घ्यावे किंवा कसे याचा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना आहे.

त्यामुळे या शासन निर्णयातील तरतूदीनुसार संवर्गांतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करताना (आंतरसंभागीय बदली करणेकरीता) शासन निर्णयातील विहीत अटी व शर्तींची पूर्तता होत असल्यास

संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करावयाची आहे. या तरतुदीनुसार कृषी विभागातील कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय बदल्या संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर करण्यात येतात.

(२) कु.पद्मा बळीराम भगत, कृषी सहाय्यक, गिरोली, ता.देवळी, जि.वर्धा यांची नागपूर संभागातून अमरावती संभागामध्ये कायमस्वरुपी समावेशनाने बदली मिळाली नसल्याची तक्रार विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती यांचेस्तरावर प्राप्त झालेली आहे. तथापि, सद्य:स्थितीत अमरावती विभागामध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये पद रिक्त नसल्यामुळे त्यांना अमरावती विभागात कायमस्वरुपी समावेशनाने/आंतरसंभागीय बदलीने पदस्थापना देण्यात आलेली नाही.

(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५/०५/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, कायमस्वरुपी समावेशन हा संबंधित कर्मचाऱ्याचा हक्क नसून प्रशासनाचे हित, सार्वजनिक सेवेचे हित विचारात घेऊन संबंधित कर्मचाऱ्याच्या विनंतीवरुन त्याचे अन्य कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करण्यास परवानगी /मंजूरी द्यावी किंवा कसे याचा आणि कायमस्वरुपी समावेशनाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यास त्यांच्या कार्यालयात घ्यावे किंवा कसे याचा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चहार्डी (ता.चोपडा, जि.जळगाव) येथील दिव्यांगानी शासकीय योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत

**(१३) १८२३० (०२-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चहार्डी (ता.चोपडा, जि.जळगाव) येथील दिव्यांग अशोक नाना पाटील यांनी दिव्यांग योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे ग्राम सचिवालयाच्या इमारतीवरुन उडी मारुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चहार्डी येथील दिव्यांगांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१३-०३-२०२३) :** १) हे खरे नाही.

(२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक २५/८/२०१८ अन्वये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून दिव्यांगांसाठी ५% निधी राखून ठेवणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने मौजे चहार्डी, जि.जळगाव ग्रामपंचायतीने दिव्यांगांसाठी ग्रामनिधीमधून रुपये २२,४२०/- इतका खर्च करण्यात आला आहे.

(३)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील नौका समुद्रात बुडाल्याने लाखो रुपयांचे नुकसान होऊन व्यक्ती बेपत्ता झाल्याबाबत

**(१४) १८२९५ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील कोळीवाडा येथील मच्छीमार श्री.रणजीत खमीस यांच्या मालकीची अन्नपूर्णा लक्ष्मी नावाची नौका समुद्रात बुडाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नौकेवर तैनात असलेले एक तांडेल व तीन खलाशी या ४ जणांपैकी एक जण बेपत्ता असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेत नौका बुडाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झालेल्या नौका मालकास तसेच बेपत्ता झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांस नुकसान भरपाई देण्याची मागणी नौका मालकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नौका मालकांनी केलेल्या मागणीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२३) :** (१) व (२) होय.

अलिबाग तालुक्यातील श्री.रणजित भगवान खमिस यांची अन्नपूर्णा लक्ष्मी ही मासेमारी नौका दिनांक १२/०१/२०२३ रोजी अलिबाग येथे समुद्राच्या पाण्यामध्ये बुडून अपघात झाला. सदर नौकेवर एक तांडेल व तीन खलाशी कामास होते. त्यापैकी एक खलाशी बेपत्ता झाला आहे.

(३) व (४) होय.

सदर दुर्घटनेतील बेपत्ता खलाशी हयांना शोधण्याबाबत कोस्ट गार्ड, मुरुड जंजिरा व पोलीस विभाग, रायगड यांना कळविण्यात आले. बेपत्ता खलाशाचा शोध घेण्यात येत असून अद्यापपर्यंत बेपत्ता खलाशी यांचा शोध लागलेला नाही.

सद्य:स्थितीत नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या नौकांना नुकसान भरपाई प्रचलित नियमानुसार अदा केली जाते. मात्र अपघाता दरम्यान झालेल्या नौकेच्या नुकसानीकरीता नुकसान भरपाई देण्याबाबत सद्य:स्थितीत कोणतीही योजना कार्यरत नाही. तथापि, बेपत्ता खलाशी यांना प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत अपघात गट विमा योजनेचा व मासेमारी संकट निवारण निधी या योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत संस्थेला कळविण्यात आले आहे. मात्र नुकसानग्रस्त नौकेच्या संस्थेची माहिती अद्याप अप्राप्त आहे. संबंधित संस्थेमार्फत परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नुकसान भरपाई देण्याबाबतची पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नव्या तालुक्यांची निर्मिती करण्याबाबत

**(१५) १८३९६ (२५-०३-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात लोकसंख्या वाढीनुसार मतदारसंघांची फेररचना करण्यात येऊन अधिकारांचे विकेंद्रीकरण आणि प्रशासनाला लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी लोकसंख्येच्या आधारे नवे जिल्हे व तालुके निर्माण करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नव्याने ७५ तालुके निर्माण करण्याची मागणी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर तालुका निर्मितीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) राज्यातील तालुका विभाजन/पुर्नरचना करण्याकरीता निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल दिनांक ०६/०३/२०१३ रोजी सादर केला होता.तथापि, महसूल विभागांतर्गत बऱ्याच सेवांचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे या बदलाच्या पार्श्वभूमीवर समितीने केलेल्या शिफारशी, निकष, गुणांक आजच्या परिस्थितीत लागू पडतीलच, असे म्हणता येणार नाही. सबब महसूल विभागातील विविध सेवांचे झालेले संगणकीकरण, माहिती तंत्रज्ञानात झालेला बदल, या बाबी विचारात घेता, राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी शासन परिपत्रक क्र. प्राफेब-२०११/प्र.क्र.९६/म-१०, दिनांक ०२/०३/२०२३ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

नवीन तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बंद असलेले किडनी ट्रान्सप्लांट युनिट सुरु करण्याबाबत

**(१६) १८४२६ (२६-०२-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) विदर्भाच्या सोबतच मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा सहित मध्य भारतातील अनेक क्षेत्रातील रूग्ण उपचारासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षापासून नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (मेडिकल) येथील किडनी ट्रान्सप्लांट युनिट पूर्णतः बंद असून प्रतिक्षा यादीनुसार ४३७ रूग्णांना किडनीची आवश्यकता असूनही अद्यापही किडनी ट्रान्सप्लांट करीता रूग्ण उपचारार्थ प्रतिक्षा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर रुग्णालयातील तातडीने बंद असलेले किडनी ट्रान्सप्लांट युनिट सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-०३-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बांबवडे (ता.पलूस, जि.सांगली) ग्रामपंचायतीतील ग्रामसेवकाने इतिवृत्त न लिहिताच ठेकेदाराना कामे दिली असल्याबाबत

**(१७) १८५०१ (१०-०३-२०२३) श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बांबवडे (ता.पलूस, जि.सांगली) ग्रामपंचायतीतील ग्रामसेवकाने पाच महिन्यांचे मासिक इतिवृत्त न लिहिताच ३० लाखांची कामे ठेकेदारांना दिली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्तहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणी चौकशी करण्याची मागणी सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२१-०३-२३) :** १) होय, हे खरे आहे.
२) होय, सदर ग्रामपंचातीच्या ग्रामसेवकाने इतिवृत्त न लिहिताच ठेकेदारांना कामे दिली असल्याबाबतची तक्रार दिनांक ०३/०१/२०२३ रोजी जिल्हा परिषद, सांगलीकडे प्राप्त झालेली आहे.
३) सदर प्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पलूस यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशीअंती मौजे बांबवडे ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांने ऑगष्ट, २०२२ पासून मासिक सभांचे इतिवृत्त लिहिले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच इतिवृत्त न लिहिताच ठरावाच्या नकला देवून त्याआधारे नियम बाह्य निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदारांना रुपये ३०,२३,२९८/- एवढ्या रक्कमेच्या कामांचे कार्यरंभ आदेश दिले आहेत. तसेच दप्तर तपासणी वेळी प्रमाणका शिवाय रुपये

१,१९,७८७/- एवढी रक्कम खर्च केली असल्याचे निदर्शनास आले आहे. ग्रामसेवकाने सदर रक्कमेचा संशयीत अपहार केला असल्याचे निदर्शनास आले असून त्यानुसार संबंधित ग्रामसेवकाची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सांगली जिल्हृयासह इतर जिल्ह्यातील बोगस पॅथॉलॉजिस्टवर कारवाई करण्याबाबत

**(१८) १८५०३ (२६-०२-२०२३) श्रीमती उमा खापरे, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सांगली जिल्ह्यातील ८० टक्के पॅथॉलॉजिस्ट लॅब अवैध असल्या प्रकरणी त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र असोसिएशन ऑफ पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट संघटनेने जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हाधिकारी व महानगरपालिका आरोग्य अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय व्यवसाय असेल तर रितसर परवाना असणे तसेच वैद्यकीय अहवाल (लॅबोरेटरीज रिपोर्ट) नोंदणीकृत पॅथोलॉजिस्टने स्वाक्षरी करुन देणे बंधनकारक असताना सांगली जिल्ह्यातील अनधिकृत वैद्यकीय प्रयोगशाळा कार्यरत असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वैद्यकीय प्रयोगशाळेचे (मेडिकल लॅबोरेटरी) नियंत्रण व नियमन करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी दिनांक २९ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे आयुक्त, आरोग्य सेवा व संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समितीने अहवालाच्या अनुषंगाने आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून मागितलेली अधिकची माहिती शासनास प्राप्त झाली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सांगली जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातील बोगस पॅथोलॉजिस्ट व अनधिकृत वैद्यकीय प्रयोग शाळांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत () :** (१) होय.
(२) सद्य:स्थितीत राज्यातील प्रयोगशाळा नोंदणीबाबत कोणताही कायदा अस्तित्वात नाही त्यामुळे या प्रयोगशाळांची नोंदणी राज्यातील कोणत्याही आस्थापनेमध्ये होत नाही. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत पॅथॉलॉजीस्ट यांची वैद्यकीय नोंदणी करण्यात येते. तसेच महाराष्ट्र पॅरामेडिकल परिषदेमार्फत शैक्षणिक अर्हतेनुसार प्रयोगशाळा तंत्रज्ञांची नोंदणी करण्यात येते. या नोंदणीकृतांवर कार्यवाही करण्याचा अधिकार सदर परिषदांना आहेत.

(३) होय
(४) आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही.
(५) वैद्यकीय प्रयोगशाळेचे (मेडिकल लॅबोरेटरी) नियंत्रण व नियमन करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी आयुक्त, आरोग्य सेवा व संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची समितीने सादर केलेला अहवाल व त्याअनुषंगाने आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून मागविण्यात आलेली अधिकची माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## नागपूर येथील मेडिकल रुग्णालयातील प्रस्तावित कॅन्सर रुग्णालयाच्या बांधकामाबाबत

**(१९) १८६०५ (२६-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मेडिकल रुग्णालय येथे प्रस्तावित कॅन्सर हॉस्पिटलच्या बांधकामासाठी सन २०१९ मध्ये ७५ कोटी तर यंत्र सामग्रीसाठी २३ कोटींच्या निधीला प्रशासकीय मंजुरी मिळाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी व यंत्रसामुग्री खरेदीसाठी निधी मिळाला नाही, त्यामुळे येथील कॅन्सर रुग्णांची अद्ययात उपचार मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन आणि निधीची तरतूद करुन या रुग्णालयाच्या उभारणीबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-०३-२०२३) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील मेडिकल व मेयो रुग्णालयात मोफत प्रसूतीपासून गर्भवती माता वंचित असल्याबाबत

**(२०) १८६०७ (२७-०२-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने ११ वर्षापूर्वी मोफत प्रसूतीसाठी “जननी शिशू सुरक्षा योजना” जाहीर केली असूनही नागपूर येथील मेयो व मेडिकल रुग्णालयांत एकही गर्भवती महिलेस या योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या गर्भवती महिलांच्या प्रसूतीचा सर्व खर्च या महिलांचे नातेवाईकांना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर येथील मेयो व मेडिकल रुग्णालयांत नागपूर येथील गर्भचती महिलांना प्रसूतीसाठी “जननी शिशू सुरक्षा योजनेचा” लाभ मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंवाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ (२१-०३-२०२३) :** १) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.